ISSN 2320-4494

Impact Factor 2.7286

# मराठवाडा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांचे कार्य व कर्तृत्व



ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

**January Special ISSUE I 2024**



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |



www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

श्री. आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव (रं.

ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

संलग्नित

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

# ई-संशोधन पत्रिका

## मुख्य संपादक
## डॉ. विनोद बोरसे

“POWER OF KNOWLEDGE”

*An International Multilingual Quarterly*

*Peer Review Refereed Research Journal*

## विशेष अंक

# मराठवाडा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांचे कार्य व कर्तृत्व


संपादकीय मंडळ

**डॉ. नवनाथ  आघाव**

(प्राचार्य

**डॉ. वसंत माळी**

(उपप्राचार्य

**डॉ. कृष्णा मालकर**

(इतिहास विभाग प्रमुख

मुख्य संपादक

**डॉ. विनोद बोरसे**

प्राध्यापक इतिहास विभाग


## कृपया नोंद घ्या

- या प्रकाशनामध्ये व्यक्त केलेले विचार हे पूर्णपणे लेखक व संशोधकाचे वैयक्तिक मत आहे. आणि श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय आणि संपादकीय मंडळ यांच्या लेखाचे विचार प्रतिबिंबीत करीत नाही.
- या प्रकाशनाचा कोणताही भाग कोणत्याही स्वरूपात लेखी पूर्वपरवानगी शिवाय पुनरुत्पादित केला जाऊ शकत नाही.


ISSN – 2320-4494



@ सर्व हक्क आरक्षीत



## प्रकाशन आणि मुद्रण

श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव (रं.  ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

# "POWER OF KNOWLEDGE"

## CONTENT


| अ.क्र. | संशोधकाचे नाव | शोध निबंधाचे शिर्षक | पान नंबर |
|---|---|---|---|
| | आघाव | – श्री ज्ञानमती माताजी (Guinness World Record) | |
| ३०. | अनुराधा संजय भारद्वाज | मराठवाडा मुक्तीसंग्राम | १२४ |
| ३१. | प्रा. गांगुर्डे रामदास भीमा | भारत उद्याची महासत्ता एक सकारात्मक दृष्टिकोनाचा विश्लेषणात्मक अभ्यास | १२६ |
| ३२. | प्रा. डॉ. संजय वाकळे | मराठवाडा मुक्तिसंग्रामात बाबासाहेब परांजपे यांचे योगदान | १३२ |
| ३३. | डॉ.श्रीधर आघाव<br>प्राचार्य नवनाथराव आघाव | मुक्तिसंग्रामानंतरच्या काळातील मराठवाडयाची शैक्षणिक प्रगती § एक अवलोकन | १३६ |
| ३४. | डॉ. शिला सखाराम सहाने | मराठवाडा मुक्तिसंग्रामातील आर्य समाजाचे कार्य | १४० |
| ३५. | मनिषा रंगनाथ पांढरे<br>प्रा. डॉ. केशव लहाने | रझाकार संघटना व मराठवाडा मुक्तीसंग्राम | १४३ |
| ३६. | Prof. Rajesh Kachru Gaikwad | Marathwada liberation day : A necessary action | १४५ |
| ३७. | स्वाती चेके<br>डॉ.राजाभाऊ करपे | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील सरदार वल्लभभाई पटेल यांची भूमिका | १४७ |
| ३८. | अमितकुमार पंढरीनाथ खरात | मराठवाडा मुक्तिसंग्राम §एक दृष्टिक्षेप | १५० |
| ३९. | प्रा. डॉ. रामकृष्ण गहिनीनाथ बोडखे | स्वामी रामानंद तीर्थ यांचे मराठवाडा मुक्तिसंग्रामातील योगदान | १५४ |
| ४०. | चंद्रकांत लक्ष्मण म्हस्के<br>डॉ. डी. एस. कळंबे | मराठवाडा मुक्तिसंग्राम | १५८ |
| ४१. | चिमाजी पांडुरंग हारके<br>प्रा. डॉ. विनायक शिंदे | हैद्राबाद मुक्तिसंग्राम आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका | १६२ |
| ४२. | पल्लवी मलकरी कांबळे | पराक्रमी योध्दा टिपू सुलतान यांची शौर्य गाथा | १६७ |

## "भारत उद्याची महासत्ता एक सकारात्मक दृष्टिकोनाचा विश्लेषणात्मक अभ्यास."

**प्रा.गांगुर्डे रामदास भीमा.**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख.
श्री.वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय मांडवगण फराटा ता.शिरूर जि-पुणे.
abhiramdip@gmail.com
Mo-No-7219456215

**प्रस्तावना:**

आज पर्यंतच्या निसर्ग नियमानुसार आधीच्या स्थानाला जे महत्त्व प्राप्त झालेले असते. ते काही कालांतराने कमी कमी होत जाते. आणि पूर्वी महत्त्व नसलेले स्थानाचा काही कालांतराने उन्नती.विकासामुळे त्याला महत्त्व प्राप्त होत असते. या निसर्ग नियमा प्रमाणे भारत एक कृषी प्रधान देश मोठ्या लोकसंख्येचा देश आहे त्याचबरोबर निसर्गनिर्मित संसाधने असणारा देश.या देशाची विज्ञान.तंत्रज्ञानातील प्रगती.सामाजिक.आर्थिक.राजकीय.कृषी.आरोग्य.संशोधन आणि संरक्षण.शिक्षण क्षेत्रातील प्रगतीची बदलती प्रक्रिया आणि दिशा बघता भारताचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील आधुनिक विविध क्षेत्रातील नेतृत्व बदल आणि ध्येय.धोरण.विविध करार विविध आंतरराष्ट्रीय महासत्ता. राष्ट्रां बरोबर असलेले आर्थिक.राजकीय.औद्योगिक. दळणवळण.सुसंवाद अंतरिक्ष शांतता सहकार्याचे मैत्रीपूर्ण सबंधाची जडणघडण आणि त्याला प्राप्त होणारा आंतरराष्ट्रीय प्रतिसाद हा दिवसेंदिवेश वाढताना दिसत आहे. विविध नैसर्गिक मानवी आपत्तीला सामोरे जाण्याचे भारतीयांचे धाडस त्यावरील सुयोग्य अशा उपायोजना वाटचाल बघता मला असे प्रस्तुत विषयासंदर्भात वाटते की या सर्व विविध घटकांची प्रभावीपणे प्रत्यक्षात कार्यवाही व अंमलबजावणी झाल्यास भारतीय समाजामध्ये जो उत्क्रांती कारक होणारा बदल आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नेहमीच मांडलेल्या भारतीय समाजा संदर्भातील स्त्री-पुरुष समानता आणि सामाजिक न्याय. समान संधी आणि न्याय हक्क बहाल करून सर्वांना बरोबर घेऊन समाज.राज्य.राष्ट्र विकास भूमिका आणि विकास परिवर्तनातील प्रभावी धोरण तळागाळातील सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचवून त्याला राष्ट्राच्या निर्णय.धोरण विकास.परिवर्तनात वाढता सहभाग निर्माण करून घेतल्यास व त्यालाआधुनिक विज्ञान.तंत्रज्ञान संशोधन उद्योग. कृषी शिक्षण क्षेत्रातील क्रांती परिवर्तनाची बळ लाभल्यास भारत एक महासत्ता उदयाला येईल यात शंका नाही. म्हणून संशोधकाला भारत उद्याची महासत्ता एक सकारात्मक दृष्टिकोनाचा अभ्यास महत्त्वाचा वाटतो आहे.

*** संशोधनाची अभ्यास पद्धती-**

प्रस्तुत संशोधन शोधनिबंध तयार करण्यासाठी निरीक्षण. वर्णनात्मक अभ्यास पद्धतीचा आधार घेतला आहे.

*** संशोधनाची उद्दिष्टे -**

१) भारत आज जागतिक राजकारणातील एक महत्त्वपूर्ण शक्ती विषयीचा अभ्यास करणे.
२) जागतिक राजकारणातील भारताचा वाढता सहभाग व प्रभावाचा अभ्यास करणे.
३) भारतातील विविध क्षेत्रातील क्रांती कारक बदल.परिवर्तनातून जागतिक महासत्तेकडे होणारी वाटचाल विषयीचा अभ्यास करणे.

*** शोध निबंधाची गृहितके -**

भारताची आज व उद्याची बदलती सामाजिक. आर्थिक. राजकीय.कृषी. संशोधन. शिक्षण. अंतराळ संरक्षण. उद्योग. नाविक क्षेत्रातील होणारा बदल परिवर्तन. आणि आंतरराष्ट्रीय राजकारणातील नेतृत्व. निर्णय. धोरण प्रक्रियेचा वाढता प्रभाव आणि वाढता जागतिक प्रतिसाद उद्याच्या भारत महासत्ता निर्मितीतील मुख्य स्रोत व आधार ठरत आहे.

**भारताचे राजकारण आणि सद्यस्थिती:**

भारताचा ७५ वा अमृत महोत्सव साजरा झाला.भारताला स्वातंत्र्य मिळवून ७४ वर्ष पूर्ण होऊन गेली. बऱ्याच लोकांनी २०२० पर्यंत भारत एक जागतिक महासत्ता बनेलअसे भाकीत केले होते.? परंतु आज खरच परिस्थिती तशी आहे काय.? भारत एक जागतिक महासत्ता बनली आहे का.? जागतिक महासत्ता कधी बनेल.? या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी भारताची सद्यस्थिती आणि भारतातील राजकारण याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. १९४७ चा भारत आणि २०२३चा भारत यामध्ये फारच मोठा फरक आपल्याला जाणवतो आहे. गेल्या ७५वर्षात भारताने अनेक क्षेत्रात खूप मोठी प्रगती केली आहे.परंतु ही प्रगती अपेक्षेप्रमाणे आणि क्षमतेप्रमाणे झालेली दिसत नाही.आज देशाची एकूण लोकसंख्या १३५ कोटीच्या वरती असून त्यामध्ये बहुसंख्य तरुण वर्ग आहे. मात्र त्यांच्या बुद्धिमतेचा व क्षमतेचा पुरेपूर उपयोग आणि वापर या देशात केला जात नाही असे मला वाटते. अनेक उच्चशिक्षित तरुणांचा कल परदेशी जाण्याकडे दिसतो आहे.त्यांच्या कल्पकतेचा उदारमतेचा, कार्यक्षमतेचा आणि बुद्धिमत्तेचा अन्य देशात फार मोठा वापर व उपयोग करून घेतला जाताना दिसत आहे.

भारतात अजूनही रस्ते वीज पाणी पर्यावरण आरोग्य शिक्षण विज्ञान संशोधन संस्कृती आर्थिक आरोग्य सामाजिक मागासलेपणा यासारख्या मूलभूत क्षेत्रात भारत खूप मागे आहे. भारतातील अनेक गावात आज जायला व्यवस्थित डांबरी रस्ता दिसत नाही. केवळ हायवे किंवा समृद्धी महामार्ग बांधून किंवा मेट्रो रेल्वे चालवून भारत महासत्ता होईल हे स्वप्न सारखे अजूनही गावांमध्ये तसे शहरांमध्ये देखील २४तास वीज आणि पाणी देणे आम्हाला शक्य झालेले दिसत नाही.शहरांची वाढ अतिशय अनिर्बंधपणे झालेली आहे. त्यामुळे अनेक शहरे बकाल बनलेली आहे. घनकचरा व्यवस्थापन प्रश्न खूप जटिल बनला आहे. लोकसंख्येच्या देशात हाताच्या बोटावर मोजण्या इतकी नोबेल पारितोषिक विजेते आणि ऑलम्पिक मेडल विजेतेआहेत. याचे मूळ कारण आपल्या शिक्षण पद्धतीमध्ये आहे. शिक्षण पद्धती विस्कळीत बनली असून शिक्षण व्यवस्थेत राजकारण आणि राजकीय हस्तक्षेप प्रमाणापेक्षा अधिक वाढल्याने शिक्षण विकासाची दारे हवी तशी खुली झालेली दिसत नाही. अजून तळागाळातल्या गरीब लोकांपर्यंत शिक्षण पोहोचलेली दिसत नाही. शिक्षणाच्या बाजारीकरणामुळे शिक्षण खूप महाग झाले आहे. खूपच कमी लोक उच्च शिक्षणापर्यंत पोहोचू शकतात.आरोग्य व्यवस्थेच्या बाबतीतही म्हणाव्या अशा सुधारणा झालेल्या दिसत नाही.देशात अजूनही वयोवृद्ध गरीब दारिद्र्यात असणाऱ्या महिला पुरुषांना, लहान मुलांना वेळेवर ऑक्सिजन मिळाला नाही म्हणून मृत पावतात. कुपोषणामुळे दरवर्षी दहा लाख बालके मृत्युमुखी पडतात. खाजगी संस्थांचा विकास व्हावा म्हणून सहकारी शिक्षण आणि आरोग्यवस्थेचा मुद्दाम बळी दिला देण्यात येत आहे.

अजूनही शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही म्हणून दरवर्षी लाखो शेतकरी आत्महत्या करताना दिसतात. हवामानाचा अचूक अंदाज वर्तवणारी यंत्रणा अजूनही आपल्याला उभारता आलेली नाही.अनेक शहरे प्रदूषण आणि वाहतूक कोंडीच्या बाबतीत जगात पुढे आहेत. उदा: भारताची राजधानी दिल्ली, मुंबई कोलकत्ता,पुणे अशा अनेक शहरांमध्ये प्रदूषण दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे.याचबरोबर देशातील सामाजिक स्थिती सांस्कृतिक स्थिती ही तितक्याच प्रमाणात ढासळताना दिसत आहे. गरीब , कष्टकरी, मजूर, महिला आणि मुलींच्या असुरक्षितेचे प्रश्न अहिरणीवर आलेली दिसतात. त्याचे मुख्य कारण म्हणजे भारतातील राजकीय अनास्था व राजकारण, राजकारणी नेता मंत्री खासदार, आमदार, उदासीन नोकरशाही आणि भारतातील अक्षम

शिक्षण पद्धती शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचाराने पोखरलेल्या व्यवस्था याला सरस्वी जबाबदार आहेत.

***भारताचे सध्याचे राजकारण:**

केवळ भारत महासत्ता होईल किंवा महासत्तेकडे वाटचाल करत आहे .असे म्हणणे चुकीचे ठरेल.कारण सध्याचे राजकारण हे सुडाचे राजकारण चालू असून जिथे लोकप्रतिनिधींना लोकांच्या अडचणी समस्या राष्ट्राच्या उन्नतीच्या विकासाच्या आणि प्रगतीच्या विचार निर्णय धोरण त्याची अंमलबजावणी देशाची संसद राज्याचे विधिमंडळे यांची निर्मिती केली असतानाही त्या ठिकाणी खुलेआम अशी विचाराची देवाणघेवाण होताना दिसत नाही. सत्ताधारी राजकीय पक्ष आणि विरोधी राजकीय पक्षाच्या राष्ट्रीय राजकीय राजकारण धोरण निर्णयात विचारात फार मोठा अभाव जाणवतो आहे. केवळ एकमेकाचे उनिवा चुका शोधून काढण्यामध्ये पार्लमेंट आणि विधिमंडळामध्ये जनतेच्या पैशाचा फार मोठ्या प्रमाणात वापर केला जाताना दिसतो आहे. दिशाहीन अक्षम राजकारण हे भारताच्या आंतरराष्ट्रीय नेतृत्वाला तसेच जागतिक प्रतिभेला लाजिरवाण असे दिसत आहे. केवळ सत्ता.सत्ता अधिकार आणि श्रेष्ठत्व अहंभाव राजकारण हे राष्ट्र समाज विकास उन्नतीला अधोगतीकडे निईल त्याची जाणीव भारतीय राज्यकर्ते.राजकारणी.नेता यांना होत असतानाही त्याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहेत. कारण भारत उद्याच्या महासत्तेसाठी नवनिर्मिती करण्यामध्ये अक्षम ठरेल आणि भारत एक उद्याची महासत्ता बनण्याचे स्वप्न अपुरे राहील की काय असे या ठिकाणी प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासांती आढळून आलेआहे.म्हणून संशोधकाला असे वाटते कर्तुत्ववान आणि बुद्धिमान उदार दृष्टिकोन व प्रतिभावंत कलागुणांनी संपन्न लोक असलेल्या भारतासारख्या मोठ्या देशाच प्रतिनिधित्व करणारे फार कमी लोक दिसत आहेत. ही बाब सुधारणे गरजेचे आहे.

***जागतिक राजकारणातील भारताचा सहभाग आणि प्रभाव:**

भारतीय परंपरा आणि संस्कृती व जगातील मोठ्या लोकशाही पैकी एक महत्वाची लोकशाही देशात असून पाश्चिमात्य राष्ट्रीय कठीण काळातून जात असताना जगात एक मोठ्या शक्तीचा उगम होत आहे २१ व्या शतकाची सुरुवात भारताने दक्षिणेतील महत्त्वाची सत्ता म्हणून केली आहे. संस्कृती पासून ते उद्योग जगतापर्यंत भारतातील अखंड घोडदौड सध्या तरी चालू दिसते आहे. ज्याप्रमाणे जागतिक अर्थव्यवस्थे अमेरिकेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे त्याची पडसाद संपूर्ण जगावर दिसून येत आहेत त्याचप्रमाणे जेव्हा जेव्हा लोकशाही संकटात आहे तेव्हा तेव्हा विषमते सारख्या जागतिक प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी भारताने जागतिक राजकीय दृष्टिकोनाने आपले निर्णय भूमिका बजावलेली दिसत आहे. ही जागतिक राजकारणातील भूमिका बदलत असताना भारताने आपल्या शेजारी आपल्या प्रतिस्पर्धी राष्ट्रांचा कल आणि दृष्टिकोन विचारात घेऊन केलेली दिसत नाही ही बाब गंभीर्याने घेतल्याशिवाय भारताला आज जागतिक राजकारणामध्ये प्रत्येक वेळी आपल्या प्रति स्पर्धा कडून विरोध होताना दिसत आहे.

***भारताचे जगातील विभिन्न राष्ट्रांशी मैत्री व युतीचे गणित:**

भारताची विचारसरणी इतर देशांपेक्षा ही वेगळी आहे.जागतिक राष्ट्राची मैत्री ठेवणे. मात्र युती कोणत्याही राष्ट्राची न करणे असे अलिप्तता वादाची धोरण आणि समाजवादी व्यवस्था. पाश्चिमात्य भांडवलशाही पासून दूर अशा वाटचाल आहे. भारताच्या या परराष्ट्र धोरणावर अनेकांनी उघड.उघडती काही केलेली दिसते आहे अनेकदा हा थट्टेचा विषय बनला होता.मात्र भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाकडे नवशेहून अधिक राजनैतिक अधिकाऱ्यांची फौज व प्रतिभावंत खासदार.आमदार.राजकीय नेता.अधिकाऱ्याची फौज आहे. भारतासह

ऑस्ट्रेलिया.अमेरिका .रशिया प्रदेशाच्या स्थिरतेसाठी भौगोलिक स्थानाचा वापर करताना दिसत आहे त्याचा भविष्यात भारतावर खूप मोठा परिणाम होणार आहे चीन आणि अफगाणिस्तानच्या रूपाने अण्वस्त्रधारी राष्ट्र भारताच्या सीमावर आहे. पाकिस्तान आणि चीनचा सलोखा सर्व नेहात असून त्याचा वापर चीन भारतावर दबाव आणण्यासाठी जागतिक राजकारणात नेहमी पुढे आहे याकडे डोळे झाक करता कामा नये.

***भारतीय अर्थव्यवस्था:**

भारताची सध्याची आर्थिक परिस्थिती ही जगातील पाचव्या क्रमांकाची मानली जाते.भारताच्या आर्थिक आणि प्रादेशिक स्वायत्ताच्या धोरणामुळे कोणत्याही बाह्य संघर्षात भारत भाग घेऊ इच्छित नाही. अफगाणिस्तानी सबंध कायम राखण्यासाठी राष्ट्रनिर्मिती हा भारतासाठी महत्त्वाचा घटक आहे. भारताने अफगाणिस्तान मध्ये पायाभूत सुविधा देण्यामध्ये मोठे योगदान दिले आहे. भारताला आपल्या प्रादेशिक सुरक्षितेची चिंता कालही होती आजही आहे.पुढेही राहील हे लक्षात घेऊन आपल्या शेजारी राष्ट्रांशी मैत्री सहकार्याची सबंध हे परिस्थिती सापेक्ष घेणे अपेक्षित आहे.

भारताच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करता भारताची अर्थव्यवस्था दिवसेंदिवस वाढत चालली आहे. भारताची लोकसंख्या सर्वाधिक भारतात तरुणांची संख्या मोठी असून हीच बाब भारताला महासत्ता होण्यासाठी फायदेशीर ठरणार आहे गेल्या दशकाभरात चिनी एक मूल योजना राबवली होती.त्यामुळे आता चीनमध्ये ज्येष्ठ नागरिकांची संख्या वाढत आहे. परिणामी चीनच्या अर्थव्यवस्थेवर पेन्शन व आरोग्य सुविधामुळे ताण येत आहे. चीन पाकिस्तान यासारखी राष्ट्र आर्थिक संकटात सापडली जात आहे. अमेरिकेवरील अवलंबित व कमी करत असतानाच भारताने दोन पावले राहण्याची गरज आहे.

भारताची जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिका रशियात जपान न्यूझीलंड स्वित्झर्लंड ऑस्ट्रेलिया इंग्लंड जर्मनी बरोबरीचे मैत्रीपूर्ण संबंध आणि सामाजिक राजकीय सुसंवाद दिवसेंदिवस वाढत आहेत. भारत राष्ट्राच्या उन्नती विकासात सकारात्मक पुढे पावले टाकताना दिसत आहे. त्यामुळे भारत आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आपल्या शेजारील शत्रू राष्ट्रांच्या निर्णय धोरणांना, अडथळ्यांना दूर करून जागतिक राजकीय खेडी व धोरण निर्णय मजबुतीने मांडताना दिसत आहे.

भारताच्या मुंबई शहरावर दहशतवादी हल्ल्यामधील मुख्य जागतिक पातळीवरील दहशतवादी महसूद आझर आणि त्याचे साथी यांना जागतिक पातळीवर जागतिक दहशतवादी संयुक्त राष्ट्र संघटनेने घोषित केले असता भारताच्या राजकीय विचाराचा प्रभावाचा विजय झाला आहे. असे म्हणता येईल. याचाच अर्थ भारताच्या सत्ता शक्ती आणि प्रभावी राजकीय धोरण याचा जागतिक राष्ट्रीय गांभीर्याने विचार करून भारताच्या राजकीय आर्थिक धोरणाची कुतहल जागतिक पातळीवर सर्वांना वाटत आहे.

भारताने बाहे जगताशी आपले आर्थिक राजकीय संबंध प्रस्थापित करण्यासाठी अफगाणिस्तान मध्ये चाभार बंदर विकसित करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर योगदान केलेले आहे. म्हणून चिनीने पाकिस्तान मध्ये भारताच्या या कृतीला शह देण्यासाठी गवधार बंदर विकसित करून चिनीने पाकिस्तान मध्ये अनेक कंपन्या स्थापित केल्या आहेत.

भारताच्या सध्या आर्थिक धोरण आणि निर्णयाची अक्षमता आपल्याला सांगता येऊ शकेल. भारत देशातील फार मोठ्या बेरोजगारीवर अजूनही मात करू शकला नाही. बेरोजगार युवकांना युवतींना नोकऱ्यांची कामाची संधी उपलब्ध करण्यामध्ये अजूनही खूप मागे आहे. पुन्हा पुन्हा नको त्याच गोष्टीवर जनतेचा भारताच्या तिजोरी चा वापर करताना राजकीय धोरणे आणि निर्णय होताना दिसतात ही बाब भारताच्या महासत्ता विकास वाटचालीतील फार मोठा अडथळा बनू शकेल असे या संशोधनाअंती पुढे आले.

**भारताचा देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यवहार आणि व्यापार:**

उद्योग आणि व्यापार यांच्यामुळे देशाची प्रगती आणि भरभराट होत असते. देश प्रगत आहे. की मागासलेला आहे. त्यावरून निष्पन्न होत असते. देशाची श्रीमंती किंवा दारिद्र्य परस्पराशी संबंधित आहेत.त्यामुळे राष्ट्रीय उद्योग व्यवहार आणि व्यापारातील आर्थिक बळ. क्षमता लक्षात घेता भारताचा अंतर्गत व्यापार वाढत आहेत. त्यासाठी रस्ते. पाणी.जमीन.कुशल कामगार यांची उपललब्धी. निर्मिती करताना दिसत आहे. व्यापारासाठी जलमार्ग.रेल्वे मार्ग.लोहमार्ग.हवाई मार्ग. वस्तू.सेवा यांच्या विनिमयातून व्यापार व्यापार वृद्धी होतानाही दिसते आहे. परंतु मध्यम व गरीब वर्गाला त्याच्या महागाईच्या उलाढालीच्या झळा कमी लागाव्या याची काळजी घेणे आवश्यक आहे.अंतर्गत व्यवहार उद्योग व्यापारात राजकीय दबाव.प्रभाव हा कमी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

***भारताचा तंत्र विज्ञानातील विकास दृष्टिकोन:**

भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय श्री. राजीव गांधी यांच्या काळातच भारतात विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा पाया घातला गेला. ते परिपूर्ण बांधण्याच काम भारतीय शास्त्रज्ञ करीत आहेत. त्यामध्ये डॉ.विजय भटकर. डॉ.एपी.जे.अब्दुल कलाम. डॉ.वसंत गोवारीकर. डॉ. रघुनाथ मार्शल अशा अनेक संशोधकांनी कार्य व योगदान....

***विज्ञान क्षेत्रात भारतीय महिलांचे योगदान:**

एकाच वेळेस १०४ उपग्रह पाठवण्यात इस्रो मधील महिला वैज्ञानिकांच एक धाडस. सौर ऊर्जा पवनचक्की औष्णिक विद्युत अनु विद्युत ऊर्जेच्या क्षेत्रातील प्रगती भारताने विधायक कार्यासाठी त्याचा वापर व उपयोग करण्याची धोरण महत्त्वपूर्ण ठरत आहे. अभियांत्रिकी क्षेत्रात अनेक चमत्कार गगनचुंबी इमारती रस्ते उड्डाणपूल भूमिगत मार्ग आपल्या प्रगतीची धोतक आहे. खेळांच्या प्रसारासाठी अनेक स्टेडियम तर भारतीय सेना अत्याधुनिक पद्धतीने योगदान देत आहे. नव्या प्रकारच्या तोफा बंदुका रणगाडे.रॉकेट बॉम्ब रडार यंत्र विमानी जहाजे पाणबुडी आता भारताच्या सार्वजनिक सुरक्षिततेसाठी रक्षणासाठी आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जाताना दिसत आहे. वेगाने चालणारी विमाने बस ट्रक कार स्कूटर रेल्वे इत्यादी वाहतुकीची साधने वाहतुकीच्या क्षेत्रात आज भारत प्रगतिशील दिसत आहे. भारतात संगणकाचा प्रवेश आणि त्याचा प्रसार झपाटने आणि होताना दिसत आहे. अशिक्षितांना शिक्षण देण्याची आणि विचार करण्याची शक्ती दिली जात आहे. वृत्तपत्रांनी भारताला जगाच्या जवळ नेले सिनेमाच्या क्षेत्रातील आपली प्रगती कौतुकास्पद आहे. भारतीयांची राहणीमान आणि चिंतन शक्ती पूर्णपणे बदलून टाकली भारत आता नवनिर्मितीत अग्रस्थानी दिसत आहे. ऊर्जेच्या क्षेत्रात आपली प्रगती जागतिक पातळीवर कौतुकास्पद आहे. नद्यांच पाणी अडवून त्याचा उपयोग सिंचन आणि विद्युत निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणावर होत आहे. चिकित्सा शास्त्राच्या विज्ञानात इतकी प्रगती झाली आहे. मलेरिया सारख्या साथीच्या रोगावर नियंत्रण ठेवता येते. शल्लचीकित्सांच्या शास्त्रात अवयवांची प्रत्यारोपण करून यश प्राप्त केले जात आहे.

इतर साध्या रोगांच्या इलाजावर संशोधन चालू आहे. कोरोना-१९ सारख्या महामारीवर सुद्धा भारतीयांनी आपल्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या जोरावर मोठ्या प्रमाणात कार्य करून आपली प्रतिभा निर्माण केली आहे.त्याचबरोबर मानवाचा वेळ आणि शक्ती वाचवण्यासाठी विज्ञान तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. विज्ञान तंत्रज्ञानामुळे अचार.विचार.ज्ञान बदलून टाकल. विज्ञानाच्या शक्तीमुळे भूगर्भातून पाणी खेचू शकतो समुद्रातून तेल काढू शकतो बॉम्बे हायवेतून निघणारी तेल हा भारतीय वैधानिक प्रगतीचा जिवंत नमुना आहे. पेट्रोलियमच्या विहिरी शोधण्यात येत आहेत. रासायनिक खतांच्या साह्याने शेत जमिनीच्या उत्पादन शक्तीला वाढविली जाताना दिसत आहे. अन्नधान्याची टंचाई दूर होत आहे. कापडाची कारखाने

अधिकाधिक वाढत आहे. उद्योगधंद्यातील प्रगती.राष्ट्रीय सुरक्षा राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सुसज्ज असे सैनिक हवाई दल निमलष्करी दली नौदल ज्यायोगे देशांनी येथील समाज लोकांची सुरक्षा सुनिश्चित केली जाऊ शकते याकडे भारतीय दृष्टिकोन हा जागतिक आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टिकोनातून महत्वपूर्ण अशी निर्णयाने देशाची वाटचाल होताना दिसत आहे.

***भारताच्या आंतरराष्ट्रीय राजकारणास जागतिक स्तरावरील प्रतिसाद:**

अमेरिका रशिया फ्रान्स इंग्लंड जपान जर्मनी यासारख्या महासत्ता आणि विकसित राष्ट्रांकडून भारताच्या राजकीय धोरण आणि निर्णय कृतीला संयुक्त राष्ट्र संघटनेने ही प्रतिसाद देऊन आज भारताची जागतिक सत्ता स्थान आणि प्रतिभा मनी केली आहे. शिवाय भारत कोणत्याही गटामध्ये समाविष्ट न होता एक स्वतंत्र शक्ती म्हणून आपली राष्ट्रीय अंतर्गत आर्थिक सामाजिक राजकीय विज्ञान तंत्रज्ञान व्यवहार व्यापार देवाण-घेवाण सहसंचार संरक्षण अशा अनेक क्षेत्रांमध्ये नवनवीन बदल आणि सुरक्षितता राखण्याची प्रयत्न करत आहे. इजराइल जपान अफगाणिस्तान तेहरान इस्रो इस्राईल दक्षिण आशियाई क्षेत्रातील श्रीलंका नेपाळ बांगलादेश भूतान यासारख्या देशांचाही मोठ्या प्रमाणामध्ये भारताच्या जागतिक राजकीय सहभागाला मान्यताप्राप्त झालेली दिसत आहे भारत प्रादेशिक समस्या संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये मांडताना निर्भीडपणे शत्रू राष्ट्रांना प्रतिउत्तर देताना दिसत आहे याचाच अर्थ जागतिक पातळीवर भारताच्या आंतरराष्ट्रीय राजकारण धोरणाला निर्णय कृतीला जागतिक प्रतिसाद लाभत आहे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या कायम सदस्यत्व साठी जपान इटली सह आफ्रिका राष्ट्र भारताच्या बाजूने आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिसाद देताना दिसत आहे

**निष्कर्ष-**

भारताच्या अंतर्गत.बाह्य राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय व्यवहार, व्यापार उद्योग, विज्ञान तंत्रज्ञान, शिक्षण, आरोग्य.कृषी संरक्षण, नाविक, अवकाश संशोधन उत्पादन क्षमता आणि विविध उदारमतवादी दूरदृष्टी राष्ट्रीय हित राष्ट्रीय समाज, गरीब-मध्यम, महिला-मुली यांचा मानसन्मान उन्नती विकास डोळ्यासमोर ठेवून सर्व समाज घटकांना राष्ट्रीय निर्णय.धोरण परिवर्तन प्रक्रियेत सहभागी करून सर्वांच्या कल्याण हितात राष्ट्रीय कल्याण अशा नवदृष्टी कोणाचा अवलंब केल्यास भारताची राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय संयुक्त राष्ट्र मधील प्रभावी भूमिका व धोरण निर्णय व वाढता बदल परिवर्तन जागतिक प्रतिसाद लाभल्याने भारत उद्याची महासत्ता एक सकारात्मक दृष्टिकोन सत्यात उतरू शकेल.

**संदर्भ ग्रंथ-**


१) जलब्री ब्लेनरी - टायरनी ऑफ जस्टिस पुस्तक.
२) मायकल ह्यु- ड स्टोरी ऑफ इंडिया.
३) एन्व्हायरमेंट मॅक्स रिपोर्ट.
४) दैनिक लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, सकाळ.लोकमत वृत्तपत्रे प्रकाशित माहिती लेख.
५) टीव्ही.रेडिओ माहिती प्रसारण व विविध आर्थिक.सामाजिक.राजकीय विश्लेषकांच्या मुलाखती.
६) संपा मांजरी मा.प.आणि कीर धनंजय.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड-१ पृष्ठ. ३५, ३६, ३७, ४०, ७०, ८८,२६८खंड-६पृष्ठ २३.
७) डॉ सिन्हा मनोज कुमार आर्थिक.सामाजिक.सांस्कृतिक अधिकाराची अंमलबजावणी.प्रकाशन यवतमाळ.


*****